**'सी.पी. राधाकृष्णन हे एक उत्तम उपराष्ट्रपती असतील': PM मोदी**

| वर्ष - 9 । अंक - 6 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

**आतील पानांत**


- श्रेयसबाबतचा निर्णय अनाकलनीय!
- राजिंदर, शिलानंद, दिलप्रीतचे स्थान कायम
- भारताची ताकद आणखी वाढली!
- तिहेरी हत्याकांडाने राजधानी हादरली


www.mahaenews.com । गुरुवार, दि. 21 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**बेस्ट पतपेढी निवडणुक** '...म्हणून ठाकरे बंधुंना एकही जागा मिळाली नाही'

# मनसे-ठाकरे युतीचा पराभव!

## बेस्ट पतपेढी निवडणुकीवरून फडणवीस व शेलारांचा टोला

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**बेस्ट पतपेढीच्या निवडणूकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी युती केली होती. मात्र मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीचा एकही उमेदवार विजयी झालेला नाही. या निवडणूकीत शशांक राव यांच्या पॅनलचे 14 उमेदवार निवडून आले आहेत. तसेच प्रसाद लाड, नितेश राणे आणि किरण पावसकर यांच्या सहकार समृद्धी पॅनलचे 7 उमेदवार निवडून आले आहेत. अशातच आता ठाकरे बंधुंच्या या पराभवावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी भाष्य केलं आहे.**





पुण्यात पत्रकारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना ठाकरे बंधुंच्या बेस्ट पतपेढीच्या निवडणूकीतील पराभवाबाबत प्रश्न विचारला होता. यावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, माझं हे मत होतं की, अशाप्रकारच्या पतपेढीच्या निवडणूकीचे राजकीयकरण करु नये. मात्र ठाकरे बंधुंनी त्याचं राजकारण केलं. शशांक राव आणि प्रसाद लाड हे आमचे नेते आहेत, मात्र आम्ही राजकीयकरण केलं नाही.'

पुढे बोलताना, 'आता दोन ठाकरे बंधु एकत्र आले, आता ठाकरे ब्रँड निवडून येणार असं त्यांनी राजकीयकरण केलं. मात्र हे राजकीयकरण लोकांना आवडलेलं दिसत नाही. त्यामुळे त्यांना एकही जागा मिळालेली नाही, या निवडणूकीत तरी त्यांना लोकांनी रिजेक्ट केलं आहे असं चित्र दिसत आहे' असं विधान मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलं आहे.

### आशिष शेलार यांचा ठाकरे बंधुंना टोला

बेस्ट पतपेढीच्या निकालानंतर मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी म्हटले की, 'आता भूमिका स्पष्ट झाल्या आहेत भाजप पक्ष म्हणून आम्ही या निवडणुकीत उतरलो नव्हतो. ही निवडणूक कामगारांची होती बेस्ट वर प्रेम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची होती. याचं राजकीय करण उबाठा आणि मनसेने केले. प्रत्येक गोष्टीच राजकारण करण याच फळ त्यांना मिळालं आणि हाती भोपळा आला. 0 + 0 हा शून्यच हे मी आधीही म्हणालो होतो. आज मुंबईचा विजय झाला, मुंबईकरांचा विजय झाला, मराठीचा विजय झाला, कामगारांचा विजय झाला.

### शशांक राव आणि प्रसाद लाड यांच्यावर महत्वाची जबाबदारी

पुढे बोलताना शेलार म्हणाले की, 'मुंबई भाजपचा अध्यक्ष म्हणून मी आज जाहीर करतो की, मुंबई महानगरपालिकेच्या स्टार प्रचारकांची मोठी यादी जाहीर होईलच, पण स्टार प्रचारक म्हणून शशांक राव आणि प्रसाद लाड यांची नावे मी आज जाहीर करत आहे. या दोघांनीच बेस्टच्या निवडणुकीत या दोन्ही भावांच्या पक्षाला मुंबईकरांचा आशीर्वाद कुठे आहे हे दाखवून दिले.'

### शिरसाट यांच्याकडून 5000 कोटींचा भ्रष्टाचार? आरोपांवर फडणवीसांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले...

सामाजिक न्यायविभागाचे मंत्री संजय शिरसाट यांच्याविरोधात आमदार रोहित पवार यांनी भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. शिरसाट यांनी 5000 कोटी रुपयांच्या जमीन घोटाळा केला आहे, असं रोहित पवारांनी म्हटलंय. याचा आरोपांना घेऊन रोहित पवार यांनी नवी मुंबईच्या सिडको भवनावर मोर्चा केला. भिवलकर कुटुंब स्थानिक नसतानाही शिरसाट यांनी त्यांना जमीन कशी दिली? असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केलाय. दरम्यान, रोहित पवार यांनी केलेल्या या गंभीर आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. असे आरोप रोजच होत असतात, पुरावे द्या, असं फडणवीसांनी म्हटलंय.

## शिरसाट यांची पाठराखण

सिडकोचं अध्यक्षपद मिळाल्यानंतर संजय शिरसाट यांनी भिवलकर कुटुंबीयांना हजारो कोटींची जमीन दिली, असा आरोप रोहित पवारांनी केलाय. त्यावर बोलताना रोहित पवार यांच्यासारखी मंडळी रोजच असे आरोप करत असतात. पण पुरावे दिले पाहिजेत. पुरावे नसताना असे आरोप करणे योग्य नाही. ही केस अजून मी पाहिलेली नाही. मात्र पुराव्यानिशी आरोप केले तर त्या आरोपांना तेवढेच परिणामकारक उत्तर दिले जाते. रोहित पवार यांच्याकडे काय पुरावे आहेत आणि रोहित पवारांनी काय आरोप केलेत हे मला माहिती नाही. पण विनापुराव्याचे आरोप केले जात आहेत, असे म्हणते फडणवीस यांनी संजय शिरसाट यांची पाठराखण केली.

### रोहित पवार यांनी नेमका काय आरोप केला?

शासनाची जमीन असूनही भिवलकर यांना ती जमीन साडे बारा टक्के दराने दिली गेली. यामागे सत्तेत असणारे लोक आहेत. सत्तेचा, पदाचा वापर करून भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पाच हजार कोटी रुपयांची जमीन भिवलकर यांना देत असताना निवडणुकीच्या अगोदर काहीतरी व्यवहार झाला. शिरसाट आणि भिवलकर यांच्यात हा व्यवहार झाला होता. कदाचित शिरसाट यांच्या पक्षालाही निवडणुकीसाठी मोठा निधी दिला गेला होता, असा गंभीर आरोप रोहित पावर यांनी केलाय.

### शिरसाट यांच्यासंदर्भात काही निर्णय होणार का?

दरम्यान, रोहित पवार यांनी शिरसाट यांच्यावर केलेल्या आरोपानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. याआधी छत्रपती संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील यांनीही शिरसाट यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. त्यामुळे आता शिरसाट यांच्यावर सातत्याने होत असलेले आरोप पाहता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काही निर्णय घेणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कोंडी सोडवणार

शहराच्या सर्वच भागांमध्ये सातत्याने वाहतूक कोंडी

# पुण्याची वाहतूक कोंडी कशी सोडवणार?

## आघाडी घेण्याची हीच योग्य वेळ



। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुण्यातील वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शहराच्या सर्वच भागांमध्ये सातत्याने वाहतूक कोंडी होते. अशा परिस्थितीत पुण्याची वाहतूक कोंडी सोडवण्यात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच लक्ष घातले आहे.सिम्बायोसिसतर्फे स्थापन करण्यात आलेल्या सिम्बायोसिस आर्टिफिशियल इंटेलिजन्स इन्स्टिट्यूटचे (साई) उद्घाटन फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात फडणवीस यांनी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्याबाबत भाष्य केले. त्यात त्यांनी पुण्याची वाहतूक कोंडी सोडवण्याबाबतीही माहिती दिली.**

फडणवीस म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमी कंडक्टर, क्वांटम कम्प्युटिंगमुळे येत्या काळात मोठे बदल घडणार आहेत. तंत्रज्ञान घोड्यासारखे असते. त्यावर स्वार होणे आवश्यक असते. तंत्रज्ञानामुळे गती मिळणे, अचूक निर्णय घेणे, कार्यक्षमतेमध्ये वाढ शक्य आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले. मात्र, 'एआय'मुळे अनेक आव्हानेही निर्माण होत आहेत. एआयद्वारे छायाचित्रे, आवाज तयार करून डिजिटल घोटाळे, फसवणूक असे प्रकारही घडतात. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानाचा जबाबदार आणि सकारात्मक वापर गरजेचा आहे. अनुकुल विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे ही काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानासाठी राज्य शासनाने मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने मुंबई, पुणे, नागपूर येथे तीन संस्थांची स्थापना केली आहे. या संस्था कायदा आणि सुव्यवस्था, कृषी, तंत्रज्ञान, प्रशासन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतील. तसेच नागरिकांनाही प्रशिक्षिक करण्यात येणार आहे पुण्याची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठीच्या उपाययोजना सुचवण्यासाठी 'गुगल'सह करार केला आहे. यात रस्त्यांवरील सीसीटीव्हीच्या विदाचा वापर करून उपाययोजना सुचवल्या जाणार आहेत. त्यातून वाहतूक नियोजन करणे शक्य होणार आहे, असेही फडणवीस यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत जाणून घेत सध्या होत असलेल्या क्रांतीमध्ये आघाडी घेण्याची हीच योग्य वेळ आहे.

'एआय'मुळे नोकऱ्यांचे काय होणार, किती नोकऱ्या जाणार असे अनेक प्रश्न आहेत. मात्र, आताच्या पिढीचा जन्म प्रगल्भ डॉट कॉम युगात झाला आहे. १९९०मध्ये डॉट कॉम सुरू झाल्यावरही असे प्रश्न निर्माण झाले होते. मात्र, भारताने त्या प्रश्नांची उत्तरे देत या क्षेत्राचे नेतृत्त्व केले. आता एआयची मोठी लाट आली आहे. अशा वेळी कृत्रिम बुद्धिमत्तेचे लोकशाहीकरण होणे महत्त्वाचे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.फडणवीस म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमी कंडक्टर, क्वांटम कम्प्युटिंगमुळे येत्या काळात मोठे बदल घडणार आहेत. तंत्रज्ञान घोड्यासारखे असते. त्यावर स्वार होणे आवश्यक असते. तंत्रज्ञानामुळे गती मिळणे, अचूक निर्णय घेणे, कार्यक्षमतेमध्ये वाढ होणे शक्य आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले. मात्र, 'एआय'मुळे अनेक आव्हानेही निर्माण होत आहेत. एआयद्वारे छायाचित्रे, आवाज तयार करून डिजिटल घोटाळे, फसवणूक असे प्रकारही घडतात. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानाचा जबाबदार आणि सकारात्मक वापर गरजेचा आहे. अनुकुल विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारणे ही काळाची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानासाठी राज्य शासनाने मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने मुंबई, पुणे, नागपूर येथे तीन संस्थांची स्थापना केली आहे. या संस्था कायदा आणि सुव्यवस्था, कृषी, तंत्रज्ञान, प्रशासन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात काम करतील. तसेच नागरिकांनाही प्रशिक्षिक करण्यात येणार आहे पुण्याची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठीच्या उपाययोजना सुचवण्यासाठी 'गुगल'सह करार केला आहे. यात रस्त्यांवरील सीसीटीव्हीच्या विदाचा वापर करून उपाययोजना सुचवल्या जाणार आहेत.

### 'एआय'मुळे नोकऱ्यांचे काय?

फडणवीस यांनी सांगितले.कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत जाणून घेत सध्या होत असलेल्या क्रांतीमध्ये आघाडी घेण्याची हीच योग्य वेळ आहे. 'एआय'मुळे नोकऱ्यांचे काय होणार, किती नोकऱ्या जाणार असे अनेक प्रश्न आहेत. मात्र, आताच्या पिढीचा जन्म प्रगल्भ डॉट कॉम युगात झाला आहे. १९९०मध्ये डॉट कॉम सुरू झाल्यावरही असे प्रश्न निर्माण झाले होते.

# परांजपे यांचा चित्रठेवा शासनाकडून जतन

## आशिष शेलार यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी




। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांचा अमूल्य चित्रठेवा राज्य शासनाकडून जतन करण्यात येत आहे. सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत यासंदर्भातील सामंजस्य करारावर बुधवारी स्वाक्षरी करण्यात आली.रवी परांजपे यांनी साकारलेली ७२ चित्रे आणि ६७ फ्रेम आर्ट वर्क अशा १३९ चित्रकृती महाराष्ट्र शासनास सुपूर्त करण्यात आल्या असून सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज कला संग्रहालय येथे त्यांचे जतन करण्यात येत आहे.**

मॉडेल कॉलनी येथील परांजपे यांच्या निवासस्थानी सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या कलाकृती सन्मानपूर्वक जतन करु, अशी ग्वाही शेलार यांनी याप्रसंगी दिली. परांजपे यांच्या पत्नी स्मिता परांजपे आणि पुरातत्त्व विभाग व संग्रहालय विभागाचे उपसंचालक हेमंत दळवी यांनी करारावर स्वाक्षरी केली.

शेलार म्हणाले, 'कॅनव्हासवर कलाकारांच्या रेषा बोलतात आणि रंग नाचू लागतो असा समाज प्रगल्भ असतो. संवेदना आणि सहवेदना जागृत करण्यामध्ये चित्रकलेचा मोठा वाटा आहे.

चित्रसाक्षरता हा परांजपे सातत्याने मांडत असलेला विषय ऐरणीवर आला आहे. समाजातील चित्रसाक्षरता वाढवण्यासाठी हा चित्रठेवा उपयुक्त ठरेल.

सुमारे साडेचार कोटी रुपयांहून अधिक रक्कम असलेल्या या कलाकृती सध्या सातारा संग्रहालयामध्ये तात्पुरत्या स्वरुपात प्रदर्शित करण्यात आल्या आहेत.

नंतर राज्यभर या चित्रकृती शासनाच्या अखत्यारितील विविध संग्रहालयांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहेत.

### परांजपे यांची चित्रे आदर्श

या चित्रकृतींमधील मोठा भाग मुंबई येथील नियोजित महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालयामध्ये प्रदर्शित करण्याचेही प्रस्तावित आहे, असेही शेलार यांनी सांगितले.कोट सध्या 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्तेचा) बोलबाला होत आहे. मात्र, 'सर्जनशील बुद्धिमत्ता' (क्रिएटिव्ह इंटेलिजन्स -सीआय) ही त्याहून अधिक महत्त्वाची आहे.परांजपे यांची चित्रे ही 'सीआय'ची आदर्श उदाहरणे आहेत.

## पिंपरी चिंचवडमध्ये पावसाची संततधार एक हजारहून अधिक नागरिकांचे स्थलांतर

# यंत्रणा सज्ज, निवारा केंद्रात सर्व सुविधा उपलब्ध!

## अग्निशमन विभागाचे बंब, बोट, रुग्णवाहिका ठिकठिकाणी तैनात; २४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणाऱ्या पाणी विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून त्या त्या भागातील पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे.**





महापालिकेने मंगळवार रात्रीपासूनच पुराने बाधित झालेल्या भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर सुरु केले असून बुधवारी सकाळी ८ वाजेपर्यंत शहरातील एक हजाराहून अधिक नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये तसेच महापालिका शाळांमध्ये स्थलांतरीत केले होते. या ठिकाणी भोजनासह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शहरात विविध ठिकाणी बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

आयुक्त शेखर सिंह हे स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून असून अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांनी देखील प्रत्यक्ष पूर बाधित भागाला तसेच येथील नागरिकांना स्थलांतरीत केलेल्या स्थळांना भेट देऊन पाहणी केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आज सकाळी ८ वाजेपर्यंत 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या भाटनगर परिसर, पिंपरी येथील सुमारे ७५ नागरिकांना कै. नवनाथ दगडू साबळे शाळा, बुद्धविहार भाटनगर व चेकान दास मेवाणी सभागृह भाटनगर येथे स्थलांतरित केले आहे. 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या लेबर कॅम्प, किवळे, केशवनगर, जाधव घाट, काळेवाडी परिसरातील ६२८ नागरिकांचे स्थलांतर म्हाडा वेलींग किवळे येथील म्हाडा सदनिका व वाल्हेकरवाडी शाळा येथे करण्यात आले आहे.

'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या पिंपळे निलख पंचशील नगर परिसरातील ३२ नागरिकांना पिंपळे निलख प्राथमिक विद्यालय क्र. ५२, ५३ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. 'इ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या रामनगर बोपखेल भागातील ४५ नागरिकांचे स्थलांतर रामनगर बोपखेल पिंपरी चिंचवड मनपा शाळा येथे करण्यात आले आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील संजय गांधी नगर हा भाग पुराने बाधित झाला असून येथील १२५ नागरिकांचे कमला नेहरू शाळा येथे स्थलांतर करण्यात आले आहे. तर, 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या पिंपळे गुरव लक्ष्मीनगर भागातील ४५ नागरिकांना भगतसिंग शाळा, गुलाबनगर, पिंपळे गुरव प्राथमिक विद्यालय क्र. ५४ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. याशिवाय बांधकामाच्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या काही कामगारांना म्हाडाच्या घरामध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

> “ पिंपरी चिंचवड शहरातील पूर परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांनी अजिबात घाबरून न जाता सतर्क राहावे. शहरातील नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होऊन पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशा भागावर महापालिका प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवले जात आहे. पुराने बाधित होणाऱ्या नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केले जात असून तेथे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांनी महापालिकेच्या नियंत्रण कक्षाला संपर्क करावा.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

### नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी केली वाहनांची व्यवस्था

शहरातील नदीकाठावरील पुराने बाधित होऊ शकणाऱ्या ठिकाणी क्षेत्रीय कार्यालयाकडील तसेच अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग, घनकचरा विभाग यांच्याकडील पथके तैनात करण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी अग्निशमन विभागाचे बंब, बोट, रुग्णवाहिका, बाधित नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी मदत केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यासाठी पीएमपीएमएलच्या बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पावसामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे ड्रेनेज चोकअप होणे, रस्त्यावर पाणी साचणे या स्वरूपाच्या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत सदर ठिकाणी टीम पाठवून त्या तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.


### जलद प्रतिसाद यंत्रणा तैनात

पिंपरी चिंचवड शहरात व धरण क्षेत्रामध्ये पावसामुळे मुळशी व पवना धरणातून करण्यात आलेल्या विसर्गामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची सविस्तर माहिती सातत्याने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून घेतली जात आहे. महापालिकेकडून पवना, इंद्रायणी व मुळा नदीच्या लगतची वस्ती, सोसायटी व भाग या ठिकाणी सर्व प्रकारच्या उपाययोजना केल्या असून प्रतिसाद यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मदत केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या ठिकाणी महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडून सर्च अँड रेस्क्यू टीम्स उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. त्याचप्रमाणे नजीकच्या ठिकाणी मदत केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था व त्याप्रमाणे आवश्यक आरोग्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे.



लोणावळा व मावळात मुसळधार पावसाचे थैमान, जनजीवन विस्कळित, पवना धरणातून सोडण्यात आलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे पवना नदी तर लोणावळा शहर व ग्रामीण परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे इंद्रायणी नदीने धोक्याची पातळी ओलांडली. दोन्ही नद्यांवरील अनेक पुल पाण्याखाली गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### वासनेला कसे जिंकता येईल ?

कितीही विद्वान् पंडित जरी झाला तरी त्याला स्वत:ला अनुभव आल्यावाचून ज्ञान सार्थकी लागले असे होत नाही. पोथी ऐकून ज्याला वैराग्य आले त्यालाच पोथी खरी कळली असे म्हणावे. पोथीत सांगितलेले ऐकून ते जो आचरणात आणतो तोच खरा श्रोता होय. वेदान्त हा रोजच्या आचरणात आणला पाहिजे, तर त्याचा खरा उपयोग. म्हणूनच सर्व प्रचीतींमध्ये आत्मप्रचीती ही उत्तम होय. जो भगवंताला शरण गेला त्याच्यापाशी शब्दज्ञान नसले तरी, त्याला मिळवायचे काहीच उरत नाही. जो शब्दज्ञानाच्या मागे जातो त्याचा अभिमान बळावतो. जो शब्दज्ञानी नसतो त्याला अभिमान नसेलच असे नाही. अज्ञानी माणसालाही अभिमान असतो, परंतु तो घालविणे सोपे असते. ‘ सद्गुरूला शरण जा ’ म्हटले, तर अज्ञानी माणूस मुकाट्याने शरण जाईल; त्याला शंका येणार नाही. काशीला जाणारे पुष्कळ रस्ते आहेत; पण कोणत्याही रस्त्याने जायचे तरी आपले घर सोडल्याशिवाय जाता येत नाही. हे जसे खरे, तसे कोणत्याही साधनात वासना बाळगून, किंवा ती देवापासून निराळी ठेवून भागणार नाही. ती देवाची करायला, तिला मारायला, देवाचे स्मरण पाहिजे. भगवंताचे होणे हे माझे या जन्मातले मुख्य काम आहे असे समजावे. मी भगवंताचा कसा होईन याचा सारखा रात्रंदिवस विचार करावा. मी दुसऱ्या कोणाचा नाही ही खात्री असली म्हणजे भगवंताचे होता येते.

आपले मन वासनेच्या अधीन होऊन तात्पुरत्या सुखाच्या मागे गेल्यामुळे थप्पड खाऊन परत येते. लोक समजतात तितके वासनेला जिंकणे कठीण नाही. आपली वासना कुठे गुंतते ते पाहावे. आपल्या अंगातले रक्त काढून ते तपासून, आपल्याला कोणता रोग झाला आहे हे डॉक्टर पाहातात, त्याचप्रमाणे आपले चित्त कुठे गुंतले आहे हे आपण पाहावे; तो आपला रोग आहे. जी गोष्ट आपल्या हातात नाही तिच्याविषयी वासना करणे वेडेपणाचे आहे, हे ध्यानात ठेवावे. म्हणूनच, विचार आणि नाम यांनी वासनेला खात्रीने जिंकता येईल. मग आपले कर्तेपण आपोआप मरून जाईल. हिमालयावर ज्या वेळी आकाशातून बर्फ पडते त्या वेळी ते अगदी भुसभुशीत असते. पण ते पडल्यावर काही काळाने दगडापेक्षाही घट्ट बनते. त्याचप्रमाणे, वासनाही सूक्ष्म आणि लवचिक आहे, पण आपण तिला देहबुद्धीने अगदी घट्ट बनवून टाकतो. मग ती काढणे फार कठीण जाते. भगवंताची वासना ही वासना होऊच शकत नाही. ज्याप्रमाणे कणीक अनेक वेळा चाळून गव्हाचे सत्त्व काढतात, त्याप्रमाणे विषयाची सर्व वासना नाहीशी झाल्यावर जी उरते, ती भगवंताची वासना होय.

**बोधवचन:- वासना मारायला भगवंताचे अधिष्ठान हा एकच उपाय होय.**

# ठाकरे-राज युतीचा बेस्टमध्ये ऐतिहासिक पराभव; “बेस्ट” निकालाने दिला ठाकरेंना राजकीय “लाल सिग्नल”



‘स्टेट’मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**मुंबईतील बेस्ट क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीचा निकाल केवळ एका पतसंस्थेच्या सत्तांतराचा प्रश्न नाही, तर मुंबईतील बदलत्या राजकीय समीकरणांचे स्पष्ट संकेत देणारी घटना आहे. ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एकत्र येऊन लढवलेली ही निवडणूक म्हणजे एक प्रकारे त्यांच्या ‘वाचाल तर वाचाल’ प्रकारातील शेवटची धडपड होती, पण निकालातून सिद्ध झाले की ही युती जनतेच्या विश्वासापासून कित्येक मैल दूर आहे.**

### सत्ता गेली आणि शून्य उरले

गेल्या नऊ वर्षांपासून बेस्ट पतपेढीवर वर्चस्व गाजवत असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची सत्ता यावेळी अक्षरशः साफ झाली. मनसेसोबत युती करूनही एकही जागा जिंकता न आल्याने ‘उत्कर्ष पॅनल’च्या नावाखाली उभ्या केलेल्या प्रयत्नांचे अपयश ठळकपणे समोर आले. याला अपयश म्हटले तरी कमीच. ही पराभवाची केवळ एक निवडणूक नाही, तर राजकीय अस्तित्वावर उठलेले मोठे प्रश्नचिन्ह आहे.

### भाजप आणि शशांक राव पॅनलचा दणदणीत विजय

दुसऱ्या बाजूला, भाजपचे आमदार प्रसाद लाड आणि बेस्ट युनियनचे नेते शशांक राव यांच्या ‘सहकार समृद्धी पॅनल’ने सर्वच्या सर्व 21 जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं. 14 जागा शशांक राव पॅनलने आणि 7 जागा भाजपने जिंकत हे सिद्ध केलं की कामगार मतदारांचा विश्वास त्यांनी संपादन केला आहे. मुसळधार पावसातही 83% इतक्या उच्च टक्केवारीने झालेल्या मतदानातून ही मतदारांमध्ये असलेली असंतोषाची भावना अधिक अधोरेखित होते.

### ‘दोन शून्यांची बेरीज’ – भाजपची खोचक टीका

भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी दोन्ही ठाकरेंना उद्देशून ‘दोन शून्यांची बेरीज’ ही संज्ञा वापरत केलेली टीका अतिशय रोखठोक आणि परिस्थितीला साजेशी होती. “गमावण्यासाठी काही उरलेलं नाही आणि कमावण्यासाठी काही शिल्लक नाही,” हे विधान आजच्या राजकीय वास्तवाची करुण छाया आहे. एकेकाळी मुंबईच्या राजकारणावर अधिराज्य गाजवणाऱ्या ठाकरे बंधूंनी जर या पराभवाचे आत्मपरीक्षण केले नाही, तर भविष्यातील आणखी गंभीर धक्क्यांना सामोरे जावे लागेल.

### संजय राऊतांची प्रतिक्रिया – जबाबदारीची पळवाट?

संजय राऊत यांची “माझ्या माहितीमध्ये नाही” ही प्रतिक्रिया ही जबाबदारी झटकण्याचे लक्षण वाटते. निवडणुकीच्या निकालाबाबत अशी अनभिज्ञता दाखवणं हे जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावनांशी प्रतारणा करण्यासारखंच आहे.

### आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी सूचक संकेत

बेस्ट पतसंस्थेच्या निवडणुकीचा निकाल हा येणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकीचा ट्रेलर मानला जाऊ शकतो. या निकालाने भाजप आणि त्यांच्या सहयोगी संघटनांनी आपलं संघटन, कामगारांशी असलेलं नातं आणि निवडणुकीतील रणनीती यामध्ये ठोस यश मिळवलं आहे, तर ठाकरे आणि राज यांच्या युतीचा पराभव म्हणजे रणनीतीचा अभाव, नेतृत्वातील गोंधळ आणि जनतेपासून दुरावलेली प्रतिमा यांचं प्रकटीकरण आहे.

बेस्ट निवडणूक म्हणजे राजकीय भूकंप नव्हे, तर भूकंपाची चाहूल देणारा जोरदार धक्का आहे. ठाकरे बंधूंनी जर राजकारणातला ‘शून्य’ झटकायचा असेल, तर केवळ युतीवर नव्हे, तर संघटनात्मक बांधणी, नेतृत्वक्षमतेचा पुनर्विचार आणि जमिनीवरच्या प्रश्नांवर काम करण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा, ही ‘शून्यांची बेरीज’ भविष्यात त्यांच्या संपूर्ण राजकीय गणितालाच फोल ठरवेल.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


## मुंबई पालिकेचा इशारा साचलेल्या पाण्यातून चालणे टाळा

# आता मुंबईकरांसमोर लेप्टोचा धोका!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मागील चार दिवसांपासून मुंबईत झालेल्या अतिवृष्टीमुळे ठिकठिकाणी पाणी साचले आहे. ती डबकी तुडवत अनेकांना जावे लागते. या साचलेल्या पाण्यातून चालताना शरीरावर जखम किंवा खरचटलेल्या भागाचा या पाण्याशी संपर्क झाल्यास त्यांना लेप्टोचा संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा पाण्यातून प्रवास केलेल्या व्यक्तींनी २४ ते ७२ तासांच्या आत वैद्यकीय सल्ला घेऊन प्रतिबंधात्मक औषधोपचार घेण्याचे आवाहन मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.**

### प्रतिबंधाच्या अनुषंगाने आयुक्तांची आढावा




अतिवृष्टी दरम्यान पावसाच्या साचलेल्या किंवा वाहत्या पाण्यातून नागरिकांना चालावे लागते. याच पाण्यात 'लेप्टोस्पायरोसिस' या रोगाचे 'लेप्टोस्पायरा' (स्पायराकिट्स) हे सूक्ष्म जंतू असू शकतात. अशा बाधीत पाण्याशी माणसाचा संपर्क आल्यास त्याला लेप्टोची बाधा होण्याची शक्यता असते. तसेच व्यक्तीच्या पायाला किंवा शरीराच्या कोणत्याही भागाला जखम असेल, अथवा साधे खरचटलेले जरी असेल; तरी अशा छोट्याशा जखमेतून सुद्धा लेप्टोचे जंतू माणसाच्या शरीरात प्रवेश करतात.'लेप्टोस्पायरोसिस' हा एक गंभीर आजार असून वेळीच औषधोपचार न केल्यास तो प्राणघातक ठरू शकतो. त्यामुळे याबाबत वेळीच प्रतिबंधात्मक औषध उपचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे ज्या व्यक्तींचा पावसाच्या पाण्याशी संपर्क आला असेल, त्यांनी तातडीने वैद्यकीय सल्ल्यानुसार प्रतिबंधात्मक औषधोपचार करावेत, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाने किंवा आरोग्य केंद्रे, दवाखाने व रुग्णालये येथे संपर्क साधावा. या ठिकाणी वैद्यकीय तपासणी-मार्गदर्शन व आवश्यक ते औषधोपचार मोफत उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

पावसाळ्यात कोणताही ताप हा डेंग्यू, मलेरिया अथवा 'लेप्टोस्पायरोसिस' असू शकतो. त्यामुळे कोणत्याही तापाकडे दुर्लक्ष न करता त्वरीत

### औषध उपचार करणे गरजेचे

तसेच व्यक्तीच्या पायाला किंवा शरीराच्या कोणत्याही भागाला जखम असेल, अथवा साधे खरचटलेले जरी असेल; तरी अशा छोट्याशा जखमेतून सुद्धा लेप्टोचे जंतू माणसाच्या शरीरात प्रवेश करतात.'लेप्टोस्पायरोसिस' हा एक गंभीर आजार असून वेळीच औषधोपचार न केल्यास तो प्राणघातक ठरू शकतो. त्यामुळे याबाबत वेळीच प्रतिबंधात्मक औषध उपचार करणे गरजेचे आहे.

डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. प्रतिबंधासाठी पायावर जखम असल्यास साचलेल्या पाण्यातून ये-जा करणे टाळावे किंवा गमबुटाचा वापर करावा. साचलेल्या पाण्यातून चालून आल्यावर पाय साबणाने स्वच्छ धुवून कोरडे करावेत.

मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष आढावा बैठकीचे प्रणालीद्वारे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीदरम्यान लेप्टोस्पायरोसिस सह डेंग्यू, मलेरिया यासारख्या पावसाळी आजारांच्या प्रतिबंधाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पावसाळी आजारांच्या प्रतिबंधाची गरज लक्षात घेऊन आवश्यक ती जाणीव जागृती करावी, तसेच वैद्यकीय उपचार क्रमानुसार आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यासह विविध स्तरीय उपाययोजना राबवाव्यात. तसेच पावसाचे पाणी साचून डास उत्पत्ती होणार नाही, यासाठी आवश्यक ती सर्व दक्षता घेण्यासह शून्य डास मोहीम राबवावी असेही आदेश बैठकीदरम्यान दिले.अतिवृष्टी दरम्यान पावसाच्या साचलेल्या किंवा वाहत्या पाण्यातून नागरिकांना चालावे लागते. याच पाण्यात 'लेप्टोस्पायरोसिस' या रोगाचे 'लेप्टोस्पायरा' (स्पायराकिट्स) हे सूक्ष्म जंतू असू शकतात. अशा बाधीत पाण्याशी माणसाचा संपर्क आल्यास त्याला लेप्टोची बाधा होण्याची शक्यता असते.

# मोनोरेल प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यास यंत्रणा अक्षम ?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मंगळवारी दोन मोनोरेल गाड्या अतिगर्दीमुळे वीज पुरवठा बंद होऊन बंद पडल्या. बंद पडलेल्या म्हैसूर कॉलनी स्थानकाजवळील गाडी दुसऱ्या मोनोरेले गाडीने खेचून स्थानकापर्यंत नेत प्रवाशांची सुटका करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि महामुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादितला (एमएमएमओसीएल) शक्य झाले नाही.**



त्यामुळे मुंबई महानगर पालिकेच्या अग्निशमन दलाची मदत घेत गाडीचा दरवाजा तोडून प्रवाशांची सुटका करण्याची वेळ मंगळवारी एमएमआरडीए आणि एमएमएमओसीएलवर आली. मात्र या घटनेमुळे मोनोरेल प्रकल्पाच्या, मोनोरेलमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास दुसरी मोनोरेल गाडी आणून बंद गाडी खेचून नेण्याशिवाय इतर कोणताही पर्याय मोनोरेलचे संचलन करणाऱ्या एमएमएमओसीएलकडे नाही. आगीसारखी घटना

### अग्निशमन दलाची मदत

मात्र त्यांचा हा दावा मंगळवारी खोटा ठरला आहे.म्हैसूर कॉलनी स्थानकानजीक मंगळवारी गाडी बंद पडली. दुसऱ्या गाडीने ती गाडी खेचूनही नेता येईना, त्यामुळे शेवटी अग्निशमन दलाची मदत घेत शिडी लावून गाडीचा दरवाजा तोडून प्रवाशांना बाहेर काढावे लागले. या घटनेमुळे आगीसारख्या दुर्घटना घडल्यास काय असा प्रश्न निर्माण झाला आहे.

घडल्यास किंवा गाडी खेचून नेणे शक्य नसल्यास प्रवाशांची सुटका करण्यासाठी एमएमएमओसीएकडे सक्षम वा स्वतंत्र यंत्रणा नाही. अशावेळी अग्निशमन दलाच्या मदतीची गरज एमएमएमओसीएलला भासत असल्याची माहिती समोर आली आहे.चेंबूर ते जेकब सर्कल अशी २० किमीची मोनोरेल मार्गिका सध्या वाहतूक सेवेत दाखल असून ही देशातील एकमेव मोनोरेल मार्गिका आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आपत्कालीन परिस्थितीशी सामाना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रकल्पात केल्या जातात.

## अग्नि ५ ची यशस्वी चाचणी

## जमिनीवरुन जमिनीवर मारा करण्याची क्षमता

# भारताची ताकद आणखी वाढली!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओडिशाच्या चांदीपूरमध्ये इंटीग्रेटेड टेस्ट रेंज येथून मध्ये बॅलेस्टिक मिसाइल अग्नि-५ चं यशस्वी परीक्षण करण्यात आलं. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार या परीक्षणात सर्व संचालन आणि तंत्रज्ञानाच्या मानकांची नोंदणी झाली. ही चाचणी स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांडच्या देखरेखीत करण्यात आली.**

## अग्नि ५ चा वेग मॅक २४ इतका



अग्नि -५ हे जमिनीवरुन जमिनीवर मारा करणार एकमेव आंतरखंडीय बॅलेस्टिक मिसाइल आहे. अग्नि -५ या मिसाइलची मारक क्षमता ५ हजार किमीपेक्षा अधिक आहे. मिसाइलमध्ये मल्टीपल इंडिपेंडेंटी टार्गेटेबल री-एंट्री वेईकल्स तंत्रज्ञानाचा समावेश आहे. म्हणजे हे क्षेपणास्त्र एकदा लॉंच केल्यानंतर अनेक टार्गेटवर हल्ला करु शकतं. अग्नि-५ मध्ये दीड टनांपर्यंत अणवस्त्र वाहून नेण्याची क्षमताही आहे. अग्नि -५ चा वेग मॅक २४ आहे या क्षेपणास्त्राची लॉंचिंग यंत्रणा कॅनिस्टर तंत्रज्ञानावर आधारित आहे. या कारणामुळं याची वाहतूक करणं देखील सोपं आहे. सध्या भारताशिवाय केवळ आठ देशांकडे इंटर कॉन्टिनेंटल बॅलेस्टिक मिसाईल आहे. रशिया, अमेरिका, चीन, फ्रान्स, इस्त्रायल, ब्रिटन आणि कोरियाचा समावेश आहे.

संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही चाचणी आज (२० ऑगस्ट २०२५) रोजी स्ट्रॅटेजिक फोर्स कमांड अंतर्गत करण्यात आली. या क्षेपणास्त्राने सर्व ऑपरेशनल आणि तांत्रिक निकष पूर्ण केले आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांच्या मते, ही चाचणी नियमित प्रक्रियेचा एक भाग आहे जेणेकरून सिस्टम तयार ठेवता येईल आणि गरज पडल्यास सिस्टम वेगात तैनात आणि सक्रिय करता येईल.भारताने आज इंटरमीडिएट रेंज बॅलिस्टिक क्षेपणास्त्र म्हणजेच आयआरबीएम अग्नि ५ ची यशस्वी चाचणी केली आहे. ही चाचणी ओडिशातील चांदीपूर येथील इंटीग्रेटेड टेस्ट रेंजमधून करण्यात आली आणि सर्व निकषांवर ही चाचणी यशस्वी ठरली आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही चाचणी आज (२० ऑगस्ट २०२५) रोजी स्ट्रॅटेजिक फोर्स कमांड अंतर्गत करण्यात आली. या क्षेपणास्त्राने सर्व ऑपरेशनल आणि तांत्रिक निकष पूर्ण केले आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांच्या मते, ही चाचणी नियमित प्रक्रियेचा एक भाग आहे जेणेकरून सिस्टम तयार ठेवता येईल आणि गरज पडल्यास सिस्टम वेगात तैनात आणि सक्रिय करता येईल.भारताने केलेल्या अग्नी ५ च्या यशस्वी चाचणीमुळे पाकिस्तानमध्ये चिंता निर्माण झाली आहे. पाकिस्तानस्थित थिंक टॅंक असलेल्या स्ट्रॅटेजिक व्हिजन इन्स्टिट्यूटने पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांना इशारा दिला आहे की भारताचा क्षेपणास्त्र कार्यक्रम पाकिस्तानसाठी “गंभीयर धोका” आहे.स्ट्रॅटेजिक व्हिजन इन्स्टिट्यूटने नमूद केले की, २०१६ मध्ये क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण प्रणाली मध्ये सामील झाल्यानंतर भारताच्या क्षेपणास्त्र विकासाला वेग आला आहे.भारताने अग्नि मालिकेतील अनेक क्षेपणास्त्रे विकसित केली आहेत .

### अग्नि ५ ची वैशिष्ट्ये

1. अग्नि ५ हे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र आहे जे अण्वस्त्रे देखील वाहून नेऊ शकते. हे क्षेपणास्त्र डीआरडीओने विकसित केले आहे.
2. अग्नि ५ ची मारा करण्याची क्षमता ५००० किमी आहे आणि डीआरडीओ त्याची मारा करण्याची क्षमता ७५०० किमी पर्यंत वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे.
3. गेल्या वर्षी, डीआरडीओने अग्नि ५ ची चाचणी केल्यानंतर हे क्षेपणास्त्र एकाच वेळी अनेक अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम झाले होते.
4. हे क्षेपणास्त्र आता शत्रूचे भूमिगत बंकर नष्ट करण्यासाठी बंकर नष्ट करणारे क्षेपणास्त्र म्हणून विकसित केले जात आहे.
5. अग्नि ५ ची पहिली चाचणी १९ एप्रिल २०१२ रोजी घेण्यात आली होती.

# तिहेरी हत्याकांडाने राजधानी हादरली

## राजधानी दिल्लीत मुलानेच आई, वडील आणि भावाला संपवलं

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताच्या राजधानीत म्हणजेच दिल्लीत एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दक्षिण दिल्लीतल्या साटबाडी गावात तिहेरी हत्याकांड घडलं आहे. सिद्धार्थ असं नाव असलेल्या मुलाने आई, वडील आणि भावाची हत्या केल्याची ही घटना आहे. याबाबतची सूचना मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाली. त्या घरात या मुलाने हाताची नस कापून घेतली होती. त्यामुळे घरात रक्तही मोठ्या प्रमाणावर आढळलं अशीही माहिती पोलिसांनी दिली.**



ANI या वृत्तसंस्थेने हे वृत्त दिलं आहे.पोलीस घटनास्थळी पोहचले तेव्हा त्या घरात पोहचल्यानंतर पोलिसांना तळ मजल्यावर दोन मृतदेह सापडले आणि पहिल्या मजल्यावर एका महिलेचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्रेम सिंह (वय ५०), रजनी (वय ४६) आणि ऋतिक (वय २४) अशी मृतांची नावं आहेत. या ठिकाणी गुन्हे अन्वेषण विभागाला बोलवण्यात आलं.

या ठिकाणी फोटोही काढण्यात आले. तसंच गुन्हा घडला आहे तो सगळा भाग सुरक्षित करण्यात आला. पुढच्या औपचारिकता करण्यात सुर करण्यात आल्या आहेत. सिद्धार्थ या मुलानेच त्याच्या आई वडिलांची आणि भावाची हत्या केली. सिद्धार्थने त्यानंतर हाताची नस कापून घेतली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सिद्धार्थ हा २२ ते २३ वर्षांचा तरुण आहे. त्याच्यावर मानसोपचार सुरु आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सिद्धार्थनेच त्याच्या कुटुंबाची हत्या केली आहे. या घटनेने राजधानी दिल्ली हादरली आहे. पोलिसांनी तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

### पोलिसांनी आणखी काय सांगितलं?

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांना मंगळवारी दुपारी एक फोन आला होता. एका मुलाने त्याच्या हाताची नस कापून घेतल्याचं या फोनवरुन सांगण्यात आलं होतं. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्या ठिकाणी पोलिसांना मृतदेह आढळून आले. त्यानंतर ही घटना उघडकीस आली. पोलीस आल्यानंतर सिद्धार्थ फरार झाला आहे.

# बॉलीवूड गाजवणाऱ्या माधुरीला एकेकाळी म्हटले जायचे पणवती

अभिनेत्री माधुरी दीक्षित(MADHURI DIXIT) धकधक गर्ल म्हणून ओळखली जाते. अभिनेत्रीने एकापेक्षा एक गाजलेल्या चित्रपटात काम करत स्वत:च्या अभिनयाची छाप सोडली आहे. आता सुपरस्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या अभिनेत्रीला तिच्या सुरूवातीच्या काळात मात्र मोठा संघर्ष करावा लागला. माधुरी दीक्षितचे सुरूवातीचे काही चित्रपट एका पाठोपाठ फ्लॉप ठरले. त्यानंतर १९८८ साली प्रदर्शित झालेला तेजाब या चित्रपटातून अभिनेत्रीला मोठी प्रसिद्धी मिळाली. त्यानंतर १९९० साली प्रदर्शित झालेला दिल, १९९२ साली प्रदर्शित झालेला बेटा, हम आपके है कोन, दिल तो पागल है अशा चित्रपटातून माधुरी दीक्षितला मोठी प्रसिद्धी मिळाली. मात्र ८० दशकाच्या अखेरच्या टप्प्यात माधुरी दीक्षितला पणवती असे म्हटले जायचे, अशी आठवण प्रसिद्ध दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी सांगितली आहे. दिल व बेटा या चित्रपटाचे दिग्दर्शक इंद्र कुमार यांनी नुकतीच सिद्धार्थ कननला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी म्हटले, “आमिर खानचा एकच चित्रपट लोकप्रिय ठरला होता. ‘कयामत से कयामत तक’ हा त्याचा चित्रपट गाजला होता. माधुरी दीक्षितबरोबर त्याने एकाही चित्रपटात काम केले नव्हते. माधुरी दीक्षितला पणवती मानले जायचे. जेव्हा मी माधुरी दीक्षितला आमिर खानबरोबर दिल चित्रपटात कास्ट केले तोपर्यंत ठीक होते. मात्र जेव्हा मी तिला बेटा या चित्रपटासुद्धा कास्ट केले, त्यावेळी लोकांनी मला वेडे ठरवले. अनेकांनी मला म्हटले होते की, तू वेडा झाला आहेस, तिचा कोणताही चित्रपट चालत नाहीये”, अशा प्रकारे अभिनेत्रीला कोणीही चित्रपटात घ्यायला तयार नव्हते, अशी आठवण इंद्र कुमार यांनी सांगितली आहे. याबद्दल अधिक बोलताना त्यांनी म्हटले, “त्यावेळी एक अशी मुलाखत आली होती.

# गोविंदा व त्याची पत्नी राहतात वेगळे

अभिनेता गोविंदाची पत्नी सुनीता आहुजाने त्यांच्या लग्नाबद्दल आणि पतीच्या रोमँटिक स्वभावाविषयी काही वक्तव्ये केली आहेत. सुनीताने सांगितलं की जेव्हा ती गोविंदाला भेटली होती, तेव्हा ती टॉमबॉयसारखी राहायची. तिचे केस लहान होते आणि ती स्कर्ट घालायची. “मी नेहमी शॉर्ट्स घालायचे. जेव्हा मी त्याला भेटले तेव्हा माझे केसदेखील लहान होते. तो म्हणायचा की मी मुलासारखी आहे. मी नेहमी साडी नेसावी अशी त्याची इच्छा होती, पण त्याबाबतीत तो मला कधीच आवडला नाही; कारण तो मागासलेल्या विचारांचा होता,” असं सुनीता हिंदी रशला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली. सुनीताने सांगितलं की गोविंदा मुलींना स्पर्श करण्यासही घाबरायचा, त्यामुळे नात्यासाठी तिनेच पुढाकार घेतला होता. गोविंदा खऱ्या आयुष्यात अजिबात रोमँटिक नाही, असं सुनीताने नमूद केलं. “आता तो रोमँटिक झाला आहे की नाही हे मला माहीत नाही. लोक तुमच्या पाठीमागे काय करतात हे तुम्हाला कधीच कळत नाही. पुरुषांवर कधीही विश्वास ठेवू नका. ते सारखे बदलत असतात. आमच्या लग्नाला ३७ वर्षे झाली आहेत. तो कुठे जाणार? पूर्वी तरी कुणाबरोबर गेला नाही, आताचं मी सांगू शकत नाही,” असं मजेशीरपणे सुनीता म्हणाली.सुनीता व गोविंदा एकत्र राहत नाही. बहुतांशी दोघेही वेगवेगळ्या घरात राहतात. गोविंदा अनेकदा त्याच्या बंगल्यावर राहतो कारण त्याला मीटिंग आणि लोकांच्या भेटीगाठींमुळे उशीर होतो.



# नेहा पेंडसेच्या घरात ६ लाखांची चोरी

छोट्या पडद्यावरील ‘भाबीजी घर पर हैं’ ही मालिका चाहत्यांच्या घराघरात पोहोचली आहे. या मालिकेत ‘अनीता भाभी’ची मुख्य भूमिका मराठी अभिनेत्री नेहा पेंडसेने साकारली आहे. दरम्यान अनिता भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहा पेंडसेच्या घरातून ६ लाखांचा रुपयांची चोरी झाली आहे. नेहाच्या घरातील एका नोकराने ६ लाखांचे दागिने चोरून पळ काढलाय. यानंतर नोकराच्या विरोधात नेहाच्या पतीने शार्दुल पोलिसांत गुन्हा दाखल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली आहे. या नोकराचे नाव सुमित कुमार सोलंकी असे आहे. एका रिपोर्टच्या माहितीनुसार, ‘भाबीजी घर पर हैं’ मालिकेतील ‘अनीता भाभी’ म्हणजे, नेहा पेंडसे तिच्या पती शार्दुलसोबत अरिटो बिल्डिंग, वांद्रे पश्चिम, मुंबईत राहते. दरम्यान शार्दुलला घरातील ६ लाखांचे दागिने लंपास झाल्याची माहिती पोलिसांना दिली आणि घरातील नोकराच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या तक्रारीत शार्दुलने चोरीला गेलेल्या वस्तुत सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी असल्याचे सांगितले आहे. दरम्यान पोलिसांनी घरातील सर्व नोकरांना बोलावून त्याची चौकशी केली. मात्र, या चौकशीदरम्यान नेहा पेंडसे घरात राहत असेलला नोकर सुमित कुमार सोलंकी बेपत्ता असून तो कुलाब्यात असल्याचे समजते. यानंतर पोलिसांनी त्याला फोनवरून या चोरीबद्दल विचारणा केली असताना त्यांने उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. या प्रकारावरून पोलिसांनी त्याच्यावर संशय घेत सुमितला अटक केली. मात्र, चोरीचे दागिने अद्याप सापडलेले नाहीत. दरम्यान त्याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ड्राइव्हरने दिलेल्या माहितीनुसार, नोकर सुमित सोलंकीची दागिन्यांवर नजर पडली आणि त्याने त्याच्यावर डल्ला मारला. नेहाच्या घरी सुमित इतर लोकांसोबत राहत होता. सोन्याचे ब्रेसलेट आणि हिऱ्याची अंगठी या दोन्ही गोष्टी नेहाने शार्दुलला गिफ्ट केल्या होत्या.



# सुरभी ज्योती लवकरच म्हणणार 'कुबूल है'?

सध्या मनोरंजन विश्वातही लगीन घाई सुरु आहे. नुकतीच आमिर खानची मुलगी आयरा खानने नुपूर शिखरेसोबत लग्न केलं तर अभिनेत्री रकुल प्रीतने देखील तिचा बॉयफ्रेंड जॅकी भगनानीसोबत लग्न करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आता आणखी एका अभिनेत्री नववधू होण्यासाठी तयार असल्याच्या चर्चा आहेत. ती अभिनेत्री म्हणजे कबूल है फेम अभिनेत्री सुरभी ज्योती. सर्वांची लाडकी झोया म्हणजेच सुरभी ज्योती तिचा बॉयफ्रेंड सुमित सुरीसोबत लग्न करणार आहे. सुरभी नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती तिच्या कामाव्यतिरिक्त लव्ह लाईफमुळे देखील चर्चेत राहिली आहे. सुमित सुरीपुर्वी सुरभीचे नाव अभिनेता पर्ल व्ही पुरीशी जोडले गेले होते. आता सुरभीच्या लग्नाची सोशल मिडियावर चर्चा होत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सुरभी ज्योती सुमित सुरीसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. सुमित हा बिझनेसमॅन असण्याबरोबरच अभिनेता आणि निर्माता आहे. सुरभी बऱ्याच वर्षांपासून सुमितला डेट करत आहे. सुरभी आणि सुमित हे 6 किंवा 7 मार्चला लग्न करणार असल्याचा दावा सुरभीच्या जवळच्या मैत्रिणीने केला आहे. तिच्या लग्नात फक्त कुटुंब आणि मित्र उपस्थित राहणार आहेत. सुमित सूरीने द टेस्ट केस आणि होम सारख्या ओटीटी शोमध्ये काम केले आहे. त्याने सुरभीसोबत एका म्युझिक व्हिडिओमध्ये काम केले आहे. 2018 मध्ये त्याच्या नात्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या.

आशिया चषक

## आशिया चषकासाठी डावलण्यात आल्याबद्दल अश्विनची टीका

# श्रेयसबाबतचा निर्णय अनाकलनीय!

।नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी भारताच्या संघनिवडीवर माजी फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने टीका केली असून लयीत असलेला फलंदाज श्रेयस अय्यरला पुन्हा संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय अनाकलनीय आणि अन्यायकारक होता, असे परखड मत त्याने मांडले आहे. तसेच गेल्या वर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघाचा भाग असलेल्या सलामीवीर यशस्वी जैस्वालला आता आशिया चषकासाठी केवळ राखीव खेळाडू म्हणून स्थान देणे हेसुद्धा योग्य नसल्याचे अश्विनने नमूद केले.**

## श्रेयसची काहीही चूक नाही






संयुक्त अरब अमिराती येथे ९ सप्टेंबरपासून रंगणाऱ्या आशिया चषकासाठी भारतीय संघाची मंगळवारी निवड करण्यात आली. यात 'आयपीएल', तसेच एकदिवसीय क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या श्रेयसला स्थान मिळू शकले नाही. "श्रेयसची काहीही चूक नाही. मात्र, आम्हालाही दोष देता येणार नाही. आपल्याकडे गुणवान खेळाडूंचे इतके पर्याय आहेत की कोणाची तरी निराशा होणारच. श्रेयसला संधीची वाट पाहावी लागेल," असे स्पष्टीकरण निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी दिले. मात्र, अश्विनला हे फारसे पटले नाही.'भारतीय संघाची निवड करणे हे खूप अवघड काम आहे, हे मी मान्य करतो. तुम्हाला काही गुणी खेळाडूंना संघाबाहेर ठेवावे लागतेच. मात्र, श्रेयस आणि यशस्वी यांच्याबाबत जे घडले, ते अनाकलनीय आहे. निवड समितीने त्यांच्याशी संवाद साधून त्यांना स्पष्टीकरण दिले असेल अशी आशा आहे," असे अश्विन आपल्या 'यूट्यूब' वाहिनीवर म्हणाला. श्रेयसने या वर्षीच्या 'आयपीएल' हंगामात पंजाब किंग्जचे नेतृत्व करताना १७ सामन्यांत ६०४ धावा केल्या.विशेष म्हणजे,त्याने या धावा १७५ हूनही अधिकच्या स्ट्राइक रेटने फटकावल्या. दुसरीकडे, राजस्थान रॉयल्सकडून खेळताना यशस्वी जैस्वालने १४ सामन्यांत १६०च्या स्ट्राइक रेटने ५५९ धावा केल्या. परंतु या दोघांनाही आशिया चषकासाठी संधी मिळू शकली नाही. त्याच वेळी कसोटी कर्णधार शुभमन गिलचे ट्वेन्टी-२० संघात पुनरागमन झाले आणि त्याला उपकर्णधारपदाची जबाबदारीही देण्यात आली."गेल्या वर्षीच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी जैस्वाल भारतीय संघात होता. तो तुमचा तिसऱ्या पसंतीचा सलामीवीर होता. मात्र, आता विश्वचषक विजेत्या संघातील या खेळाडूला बाहेरचा रस्ता दाखवून गिलला संधी देण्यात आली आहे. गिलला माझा अजिबातच विरोध नाही. उलट त्याच्यासाठी मला आनंद होत आहे. मात्र, त्याच वेळी मला श्रेयस आणि यशस्वीसाठी वाईट वाटत आहे. त्यांना दिलेली वागणूक अन्यायकारक आहे," असे अश्विनने सांगितले. श्रेयसच्या कामगिरीवर एकदा नजर टाका. त्याला याआधीही संघाबाहेर करण्यात आले होते. त्यानंतर चॅम्पियन्स करंडकापूर्वी त्याने भारतीय संघात पुनरागमन करताना उत्कृष्ट कामगिरी केली. भारताच्या जेतेपदात त्याची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. गिल सध्या अप्रतिम कामगिरी करत आहे यात शंका नाही. मात्र, श्रेयसबाबतही हेच म्हणता येईल. गेल्या वर्षीच्या 'आयपीएल'मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली कोलकाता संघाने जेतेपद पटकावले. त्यानंतर या वर्षीच्या स्पर्धेत त्याने पंजाब किंग्जचे यशस्वी नेतृत्व केले. पंजाबला २०१४ नंतर पहिल्यांदा अंतिम फेरी गाठता आली. तसेच उसळी घेणाऱ्या चेंडूंविरुद्धही आता तो पूर्वीसारखा अडचणीत सापडत नाही. त्याने कगिसो रबाडा आणि जसप्रीत बुमराविरुद्धही सहजपणे फटकेबाजी केली. त्याने आणखी काय करायला हवे?" असा प्रश्नही अश्विनने उपस्थित केला.श्रेयस आणि यशस्वी हे दोघेही अतिशय नि:स्वार्थीपणे खेळणारे फलंदाज आहेत. ते स्वत:च्या कामगिरीपेक्षा संघहिताला महत्त्व देतात. आपण किती धावा केल्या, यापेक्षा आपण धावा किती वेगाने केल्या याबाबत, अर्थात सरासरीपेक्षा स्ट्राइक रेटबाबत ते अधिक विचार करतात. असे खेळाडू तुम्हाला हवे असतात. मात्र, इथे त्यांना भारतीय संघात स्थान मिळत नाही. हे समजण्यापलीकडचे आहे. ते यापुढे असे नि:स्वार्थीपणे खेळतील का? आता त्यांनी स्वत:च्या कामगिरीला आणि धावांना प्राधान्य दिले, तर त्यांना दोष देता येऊ शकेल का?

### अक्षरचा दोष काय?

कैफ भारतीय संघाने अखेरची ट्वेन्टी-२० मालिका इंग्लंडविरुद्ध खेळली, त्यावेळी डावखुरा अष्टपैलू अक्षर पटेल उपकर्णधार होता. मात्र, आता आशिया चषकासाठी तो संघात असूनही उपकर्णधारपदाची धुरा शुभमन गिलकडे सोपविण्यात आली आहे. अक्षरने असा काय दोष केला की त्याला आपले पद गमवावे लागले आहे, असा प्रश्न माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने उपस्थित केला.

## राजिंदर, शिलानंद, दिलप्रीतचे स्थान कायम

# आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी अपेक्षित संघनिवड

।नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुढील आठवड्यात होणाऱ्या आशिया चषक हॉकी स्पर्धेसाठी भारतीय संघात कोणतेही मोठे बदल करण्यात आलेले नाहीत. स्पर्धेसाठी १८ सदस्यीय संघाची बुधवारी घोषणा करताना मध्यरक्षक राजिंदर सिंग, आक्रमकपटू शिलानंद लाक्रा आणि दिलप्रीत सिंग यांचे स्थान कायम राहिले आहे.**



आशिया चषक हॉकी स्पर्धा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत बिहारच्या राजगीर येथे होणार आहे. विजेत्या संघाला पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार आहे. भारतीय संघाचे नेतृत्व हरमनप्रीत सिंगकडे कायम ठेवण्यात आले असून, सध्या सुरू असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी निवडलेल्या संघातील खेळाडूंचाच आशिया चषकासाठी विचार करण्यात आला.राजिंदर हा समशेर सिंगची जागा घेईल. अलीकडेच निवृत्त झालेल्या ललित उपाध्यायच्या जागी शिलानंद लाक्राला पसंती देण्यात आली, तर गुरजंत सिंग्च्या जागी दिलप्रीतवर विश्वास दाखवण्यात आला. भारतीय संघात अनुभवाला प्राधान्य देण्यात आले आहे. स्पर्धेत भारताचा 'अ' गटात समावेश असून, जपान, चीन, कझाकस्तान हे गटातील अन्य संघ आहेत.आम्ही अनुभवी संघ निवडला असून, आंतरराष्ट्रीय स्तरावरील दडपणाचा सामना कसा करायचा हे प्रत्येक खेळाडूला चांगले माहित आहे. मी संघाबाबत समाधानी आहे. सर्व आघाड्यांवर संतुलन राखण्यात आल्यामुळे मिळणारी सामूहिक ताकद मला महत्त्वाची वाटते," असे मत मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी व्यक्त केले.आशिया चषक हॉकी स्पर्धा २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत बिहारच्या राजगीर येथे होणार आहे. विजेत्या संघाला पुढील वर्षी होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार आहे.

### आम्ही अनुभवी संघ निवडला

सध्या सुरू असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी निवडलेल्या संघातील खेळाडूंचाच आशिया चषकासाठी विचार करण्यात आला.राजिंदर हा समशेर सिंगची जागा घेईल. अलीकडेच निवृत्त झालेल्या ललित उपाध्यायच्या जागी शिलानंद लाक्राला पसंती देण्यात आली, तर गुरजंत सिंगच्या जागी दिलप्रीतवर विश्वास दाखवण्यात आला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। गुरुवार ।
। दि. 21 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## कासारवाडी परिसरातील पवना नदी ओसंडून वाहत आहे

# भर पावसात नागरिकांसाठी 'ऑन फिल्ड'!

### पवना नदी पूरस्थितीत सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांचा पुढाकार

। चाकण ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड– पवना धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्यामुळे कासारवाडी परिसरातील पवना नदी ओसंडून वाहत आहे. या संकटाच्या काळात, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर या ननागरिकांसाठी प्रत्यक्ष मैदानात उतरल्या असून, झोपडपट्टी भागात जाऊन त्यांनी लोकांना दिलासा दिला आहे.**

सोमवारपासून पिंपरी चिंचवड शहरात पावसाची संततधार सुरू आहे. यामुळे पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. याचा परिणाम कासारवाडी भागातील कारळे चाळ, हिराबाई झोपडपट्टी आणि वंजारी चौक भागात पाणी साचल्याचे पाहायला मिळाले. याची दखल घेत सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा जवळकर यांनी या भागांना भेटी देत नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू केले. त्यांनी प्रशासनाच्या पथकांबरोबर समन्वय साधत गरजूंना मदत पोहचवण्याचा प्रयत्न केला. नदीकाठच्या नागरिकांनी घाबरू नये. प्रशासन सज्ज आहे आणि आम्ही सामाजिक कार्यकर्ते तुमच्या पाठीशी आहोत. आवश्यकतेनुसार स्थलांतर करण्यात येईल. नागरिकांनी फक्त सतर्क राहावे,असे आवाहन प्रतिभा जवळकर यांनी केले.



## 'कॅप्शन' शॉर्टफिल्मने मारली बाजी!

### राष्ट्रीय पातळीवर मानाचा तिसरा क्रमांक;सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते गौरव

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ठाणे आर्ट गिल्ड (TAG) संस्थेतर्फे दरवर्षी आयोजित केला जाणारा राष्ट्रीय लघुपट महोत्सव यंदा मुंबईतील प्रतिष्ठित रवींद्र नाट्यमंदिर प्रभादेवी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यंदाच्या महोत्सवात देशभरातून आलेल्या तब्बल ७९ शॉर्टफिल्म्स पैकी केवळ ११ शॉर्टफिल्म्स अंतिम फेरीसाठी पात्र ठरल्या. या दिग्गज स्पर्धेत सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील कुडाळ येथील दिग्दर्शक गणेश धोत्रे यांच्या 'कॅप्शन' या लघुपटाने आपली वेगळी छाप पाडत "सर्वोत्कृष्ट शॉर्टफिल्म मध्ये तृतीय" राष्ट्रीय सन्मान पटकावला.**



या पारितोषिकाचे वितरण महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते संपन्न झाले. या गौरवप्राप्त क्षणी उपस्थित प्रेक्षक, परीक्षक मंडळी आणि आयोजकांनी 'कॅप्शन'ला दिलखुलास प्रतिसाद दिला.'कॅप्शन'मध्ये प्रमुख भूमिका ओम जवळे, अल्पेश चव्हाण, संतोष पाटील, अभिजीत सकटे, विकास बोराडे, विशाल शिरतोडे, वैशाली माळगी, शंकर मदने, विजय चिकणे, अमोल लोखंडे यांनी साकारल्या आहेत. या लघुपटाचे निर्माते विजय चिकणे आणि अमोल लोखंडे असून, निर्मिती व्यवस्थापन विकास बोराडे, लेखक विक्रम मारुती शिरतोडे, छायाचित्रण आणि संकलन प्रताप जोशी, कास्टिंग दिग्दर्शक विशाल शिरतोडे, सहाय्यक दिग्दर्शक प्रमोद कसबे आणि नवल क्षीरसागर, साउंड रेकॉर्डीस्ट अक्षय मोरे, यांनी महत्त्वाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

ड्रीम विनर प्रोडक्शन आणि रोडमॅप एन्टरटेन्मेंट निर्मित 'कॅप्शन' लघुपट हा सोशल मीडियाच्या अतिरेकी आणि अनावश्यक वापरामुळे समाजावर आणि वैयक्तिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांवर प्रखर भाष्य करणारा आशयपूर्ण सिनेमा आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माणूस किती 'कनेक्टेड' असूनही किती 'अलिप्त' झाला आहे, हे वास्तव या लघुपटातून प्रभावीपणे मांडण्यात आले आहे.

> "'कॅप्शन' लघुपटाने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेला हा मानाचा तिसरा क्रमांक केवळ साताऱ्याचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे नाव उज्वल करणारा आहे. ही केवळ माझी नाही, संपूर्ण टीमची मेहनत आणि एकत्रित विचारांची फलश्रुती आहे. या सन्मानामुळे आमचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला आहे."
> **-गणेश धोत्रे**, दिग्दर्शक

## तीन दिवसीय परिषद: दुबईत व्यापार उद्योग जगताविषयी मार्गदर्शन

# मराठी उद्योजकांचा आता अटकेपार झेंडा!

## दुबईत मराठी उद्योजकांच्या जागतिक परिषद 2025 चे उद्घाटन संपन्न

| पिंपरी चिंचवड |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: परदेशातील नोकऱ्यांबरोबरच आता उद्योगविश्वातही मराठी माणसाचे पाउल पुढे पडावे मराठी उद्योजकाला व्यवसायासाठी जगभराची दारे उघडी व्हावीत,जगातील मराठी उद्योजक एकत्र येऊन एकमेकांना सहकार्य करावे अशा अनेक संकल्पनेतून सुरू असलेलेल्या ग्लोबल इंटरपीनर दुबई 2025 चे उद्गाटन आज दुबईत मोठ्या उत्साहात आणी जगभरातील मराठी उद्योजकांच्या प्रचंड प्रतिसादात उद्गाटन समारंभ पार पडला.**




या परिषदेचे उद्घाटन भारत - दुबई,युनायटेड अरब इमिराती चे वाणिज्य दूत सतीशकुमार स्वान ,अल अली ग्रुप ऑफ कंपनीचे कार्यकारी संचालक दुबईचे एच.ई.याकुब अल अली ,जेष्ठ विचारवंत व लेखक संदीप वासलेकर,प्रतापराव पवार ,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील ,माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी उद्गाटन सत्रात मार्गदर्शन केले .

सलग तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत जगभरातील विविध क्षेत्रातील यशस्वी उद्योजक आणी तद्द मार्गदर्शक या परिषदेस मार्गदर्शन करणार आहेत .यावेळी नवउद्योजकांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत .प्रास्ताविक मनोगत या परिषदेचे संयोजक व महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे उपाध्यक्ष सचिन इटकर,यांनी केले.यावेळी प्रमुख मार्गदर्शक यांचे स्वागत गर्जे मराठी चे आंनद गानू व पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कार्यकारी संचालक गिरीश देसाई यांनी केले .

भारत आणि दुबई संयुक्त अरब अमिरातीचे वाणिज्य दूत सतीशकुमार शिवन म्हणाले की ,येत्या 2047 पर्यंत भारताचा विकास दर सहा दशलक्ष डॉलर पर्यंत जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला .यामध्ये सर्व भारतीय उद्योजकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले .जेष्ठ उद्योजक व सकाळ समूहाचे प्रतापराव पवार यांनी मराठी उद्योजकांनी प्रत्येक क्षेत्रात आघाडी घेतली आहे .परंतु मराठी उद्योजकांनी त्याला योग्य व्यवहाराची जोड देणे गरजेचे असल्याचे सांगितले .

पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी मराठी उद्योजकांच्या या नव्या संकल्पनेचे कौतुक केले .तसेच दुबई हे जगातील उद्योग जगताचे प्रवेशद्वार असून या संधीचा उद्योजकांना योग्य उपयोग करावा असे आवाहन केले .

दुबईतील प्रसिद्ध उद्योजक व अल अली समूहाचे सर्वेसर्वा एच.इ.याकुब अल अली यांनी भारतीयांनी दुबईत आपला व्यवसाय वाढवावा आम्ही त्यांचे सदैव स्वागत करू आणि पूर्ण सहकार्य करण्यास उत्सुक असल्याचे सांगितले.

आध्यात्मिक गुरु स्वामी ब्रह्मविहारी यांनी उद्योजकांना व्यवसायाबरोबर नैतिकता किती गरजेची आहे याची महती सांगितली.

भारती विद्यापीठाचे सचिव व माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी आपल्या मनोगत्ता मध्ये युवक उद्योजकांनी नव्या संधी कशा निर्माण होतात त्याविषयी अधिक लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले

महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे अध्यक्ष अतुल शिरोडकर यांनी महाराष्ट्र राज्य उद्योगांमध्ये अग्रेसर राहण्यासाठी शासन आपल्या सर्वांच्या पाठीशी कायम उभे राहील असा विश्वास व्यक्त केला .असेच नव नवे उपक्रम जगभर आयोजित करण्यात आले पाहिजे व सर्व उद्योजकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर, प्रतापराव पवार, जेष्ठ विचारवंत तथा लेखक संदीप वासलेकर, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, 'गर्जे मराठी' चे संस्थापक अध्यक्ष आनंद गानू, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषदेचे (एमइडीसी) अध्यक्ष अतुल शिरोडकर, पिंपरी- चिंचवड ट्रस्टच्या उपाध्यक्षा पद्मजा भोसले, गिरीश देसाई, कार्यक्रमाचे संयोजक सचिन इटकर यांसह देशातील आणि परदेशातील विविध क्षेत्रातील प्रमुख उद्योजक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## एकाच निविदेत बहु-नावांचा खेळ; लाखोंचा अपहार

## माजी नगरसेवक काळुराम पवार यांचा आरोप; भ्रष्ट अधिकारी व ठेकेदारांवर गुन्हे दाखल करा

| पिंपरी चिंचवड| प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या प्रशासकीय कार्यकाळात अनेक अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांची लूट केली आहे. पुढील दोन आठवड्यात अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना निलंबित करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांच्याकडून हडप केलेली रक्कम व्याजासह वसूल करावी आणि या भ्रष्टाचारात सामील असणाऱ्या ठेकेदारांना काळया यादीत टाकावे अशी मागणी माजी नगरसेवक काळुराम पवार यांनी बुधवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केली.**



यावेळी संतोष तेलंग, किरण तेलंग, जितेंद्र ननावरे, गणेश शिंदे, तेजस आगमने, आनंद भिल्ला, मयूर बागले, विजय पाटील, राम विश्वकर्मा कार्यकर्ते उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड मनपा, झोनिपू स्थापत्य विभागातील अधिकारी आणि एच.डी.असोसिएट, तुषार गायकवाड, सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन, पद्मिनी कन्स्ट्रक्शन, शहाबाज बशीर तांबोळी, सिद्धीकी प्लंबिंग अँड ड्रेनेज सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर, देव कन्स्ट्रक्शन या ठेकेदार कंपन्यांनी कार्यकारी अभियंता राजेंद्र विष्णू शिंदे आणि संबंधित इतर अधिकाऱ्यांनी संगनमताने एकाच कामाची मनपा कडून अनेकदा बिले घेतली आहेत. तसेच अर्धवट काम करून पूर्ण बिल घेणे, निविदेत ठरलेल्या कामापेक्षा प्रत्यक्ष कमी काम करून पूर्ण रक्कम घेणे, निविदेत ठरलेल्या दरापेक्षा ज्यादा मापे नोंद करून ज्यादा बिल घेणे, सार्वजनिक स्वच्छता गृहामध्ये टाइल्स चे फक्त पॅचवर्क करून पूर्ण बिल घेणे, अनेक ठिकाणी फक्त चेंबरचे झाकण बसवून पूर्ण चेंबरच्या बांधकामाचे बिल घेणे आणि एकाच कामाच्या वेग वेगळ्या नोंदी करून दोनदा बिल घेऊन महानगरपालिकेची कोटयावधी रुपयांची फसवणूक करून सामान्य जनतेच्या पैशांची लूट केली आहे.

पुढे बोलताना पवार म्हणाले देव कन्स्ट्रक्शन यांनी एका 24 लाखांच्या निविदा रक्कमेत बिल घेताना ठेकेदाराने क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे जिमचा उल्लेख करून बिल घेतले. तर दुसरे प्रिफायनल बिल घेताना रामेश्वर डोलारे निवास ते अरविंद गावडे निवास असा उल्लेख करून पुन्हा बिल घेतले. मात्र ही दोन्ही बिले एकाच ठिकाणची आहेत. फक्त त्या ठिकाणाची नावे वेगवेगळी दिली आहेत. याविषयी संदर्भ मोजमाप पुस्तकात नोंदी दिसून येतात. अशाप्रकारे महानगरपालिकेच्या तिजोरीची लूट संबंधित अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी संगनमताने केली आहे.

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



“ विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.

**- प्रदीप जांभळे पाटील,**
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेच्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.





EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org